निम्न शिक्षण : कुणासाठी...कशासाठी...?

प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी,
समन्वयक,
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय,
उदगीर जि. लातूर. ४१३ ५१७
दूरध्वनी :०२३८५-२५८७५६ (का)
भ्रमणध्वनी : ९४२२६ ५७८५०

आपला देश कृषिप्रधान आहेच. हे आता पुन्हा नव्याने सांगण्याची गरज उरलेली नाही. मात्र हे सतत ध्यानात ठेवलेच गेलेही पाहिजे. आपली निम्म्याहून अधिक अर्थव्यवस्थाही ग्रामीण व्यवसाय, ग्रामीण रोजगार, ग्रामीण संस्कृतीशी निगडित आहे. ग्रामीण पायाभूत जीवनाचा कणा शेतीच असल्यामुळे अर्थव्यवस्थेचा असा संबंध सिद्ध होतो. मात्र नजिकच्या काळात शेतीसोबतच अगदी बरोबरीने पशुपालन व्यवसायही योगदान देतो आहे. अन्न व खाद्यपदार्थ यांच्या बदलत्या गरजांमुळे व नव्या प्रणालींमुळे तसेच अर्थव्यवस्थेच्या जागतिकीकरणामुळे उपलब्ध होणाऱ्या संधीमुळेही पशुपालन व्यवसाय तेजीत आला आहे. सुदैवाने अगदी अनादी काळापासून आपण पशुपालन संस्कृती फार जाणिवेने जपली आहे. त्यामुळे कृषिप्रधानतेबरोबरच आपल्या देशाला पशुप्रधानतेचाही वसा लाभला आहे. जगात जनावरांची सर्वात जास्त संख्या आपल्या देशात आहे. त्याचप्रमाणे गेल्या काही वर्षांपासून दुग्धोत्पादनातही आपण पहिल्याच क्रमांकावर आहोत. विशेष म्हणजे याबाबतीत अमेरिकेसारख्या अतिप्रगत देशालाही आपण पिछाडीवर टाकले आहे. मात्र आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, अमेरिकेतील जनावरांची संख्याही आपल्या तुलनेत खूपच कमी आहे. याचा अर्थ आपल्यापेक्षा जनावरांची संख्या कमी असूनही तो देश दुग्धोत्पादनात मात्र आपल्याहून सरस होता. आता मात्र ही परिस्थिती बदलून आपण सर्वाधिक दुग्धोत्पादनाचे मानकरी ठरलेलो आहोत. याचे सर्व श्रेय ग्रामीण भागातील शेतकरी व पशुपालक यांनाच निर्विवादपणे जायला हवे. अर्थात त्यात शासनाच्या योजना, सहकारी तत्वावरील संस्था यांचेही श्रेय आहेच. मात्र आजही, एवढे दुग्धोत्पादन करूनही काही बाबतीत आपण अधिक प्रगती साधणे आवश्यक आहे. उदाहरणादाखल सांगायचे तर, दरडोई (जनावरांच्या) अपेक्षित दुग्धोत्पादनात, त्याचप्रमाणे दरडोई (माणसांच्या) गरजेएवढे दूध उत्पादन आपण करू शकलेलो नाहीत. त्यामुळे सर्वाधिक दूध उत्पादन करूनही आपण एका अर्थाने पिछाडीवरच आहोत. त्याची अनेक कारणे आहेत. पण पशुपालन व्यवसायापुरता विचार करावयाचा झाला तर किमान रोगांवरील नियंत्रण, निगा व आहार, नियोजन, या सर्व निगडित बाबींकडे ग्रामीण भागातील पशुपालकांचे अज्ञानातून होणारे दुर्लक्ष हे एक फार मोठे कारण त्यामागे आहे. योग्य शास्त्रीय माहितीच्या आधारे ही त्रुटी दूर केली तर दुग्धोत्पादनासोबतच आहार, आरोग्य आणि अर्थनियोजनाच्या बाबतीत आपण खूप प्रगती करू शकू, एवढी सुप्तव्याप्त शक्ती (Potential) या क्षेत्रात दडलेली आहे. त्यामुळेच या क्षेत्राचे महत्व ओळखून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापिठाची स्थापना केली व या क्षेत्राच्या प्रगतीचे सूतोवाच केले. विद्यापिठानेही लगोलग आपल्या विविध योजनांद्वारे अभ्यास व संशोधनासोबतच माहितीचा स्रोत निर्माण करणाऱ्या योजना आखल्या. त्यांपैकी एक अत्यंत महत्वाची योजना म्हणजेच निम्न शिक्षण शाखा.

साधारणपणे असे दिसून आले आहे की, जगभर प्रगतीच्या नव्या संकल्पनांचे वारे वाहत असताना, आपला देश त्यात एक महत्वाची भूमिका बजावत असताना, पशुवैद्यक क्षेत्रातही खूप आघाडी घेणे राहून गेले आहे आणि आता या क्षेत्राचा विकास करणे गरजेचे आहे. त्यामुळे अनेक पशुवैद्यक पदवीधरांची गरज आजही शासनास आहे. रोगांवरील नियंत्रणातून किमान अपेक्षित उत्पादन गाठता येण्यासारखे आहे. त्याचप्रमाणे या

रोगोपचारांत नवनवीन संशोधित प्रणालींचाही अंतर्भाव होणे गरजेचे आहे. मात्र आजही पशुसंख्येच्या तुलनेत अगोदरच संख्येने त्रोटक असलेल्या निष्णात पदवीधरांचा वेळ व श्रम पारंपारिक व्याधी व रोगांवरील पारंपारिक पद्धतीनेच उपचार करण्यात व्यतीत होतो आहे. अत्याधुनिक तंत्रांच्या अतिप्रगत काळातही आमचा पशुवैद्यक पदवीधर त्याच जुन्या समस्यांमध्ये गुरफटला आहे. त्याचे निरीक्षणातून असे निदान होते की, यामागे पशुपालन व्यावसायिकांमध्ये शास्त्रीय पद्धतींबद्दल विलक्षण अज्ञान आहे. मुळात या व्यवसायातील सुप्त शक्तींबद्दलच माहिती या पशुपालकांपर्यंत पोचलेली नाही. ती पोचवण्याचे मार्गही संकुचित आहेत. मर्यादित आहेत. कशा पद्धतीने पशुपालन व्यवसाय केला तर तो अधिकाधिक लाभदायक ठरेल याचा विचार बऱ्याच अंशी केला जात नाही. एकतर भांडवलाची तुटपुंजी शिदोरी, त्यात नुकसानीची भीती. वर नियोजन तंत्राच्या माहितीचा अभाव अशा अनेक कारणांमुळे या व्यवसायाबद्दल गैरसमजही खूप आहेत. दुसरीकडे दारात जनावरे आहेत. बऱ्यापैकी (किमान दहावीपर्यंत) शिक्षण झालेले आहे. तारुण्यातील उमेद व ताकदही आहे. मात्र मार्ग नाहीत. त्यामुळे स्वतःजवळ असलेल्या कुवतीचाही विनियोग करण्याची संधी नाही, अशा स्थितीवशतेतून निकामीपण व नैराश्य ग्रामीण भागातील बेरोजगार तरुणांना येवू शकते. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापिठाने ही सर्व परिस्थिती अभ्यासून किमान माहिती साधनांच्या, मार्गांच्या अभावाचा अडसर दूर करण्याचे ठरवल्यामुळे निम्न शिक्षण विभाग सुरू केला. सुदैवाने या विभागाला भरपूर प्रतिसाद अनेक मातब्बर धुरिणांनी दिला. त्यामुळे आता या छोट्या विभागाची स्वतंत्र व स्वायत्त अशी विद्याशाखाच करण्याची गरज झाली आहे, एवढा व्याप व यश लाभले आहे.

मात्र, त्यासाठी सर्व काही निर्दोष होण्यासाठी काही बाबी जाणिवेने लक्षात घेणे गरजेचे आहे.

त्यापैकी सर्वात महत्वाची बाब ही की, पशुवैद्यक क्षेत्र हे अतिशय अगाध असे विज्ञान आहे. ते अगदी थोड्या कालावधीत, काही केवळ ठोकताळ्यांनी आत्मसात करता येणे कठीण आहे. त्याचप्रमाणे रोगोपचारासारख्या क्लिष्ट ज्ञानशाखेकडे केवळ रोजगाराचे साधन म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. या क्लिष्ट शाखेतील पारंगत व निष्णात पदवीधरांचे त्याबाबतीतील सर्वंकष शिक्षण देण्यास विद्यापीठ बांधील आहे, सक्षमही आहे आणि ही क्षमता राष्ट्रीय पातळीवर विद्यापिठातील विद्यार्थ्यांनी वेळोवेळी सिद्धही केली आहे. त्याची उदाहरणे देणे इथे या लेखापुरते प्रस्तुत होणार नाही. मात्र वर उल्लेख केल्याप्रमाणे प्रत्यक्ष पशुवैद्यक सेवा देत असताना ज्या आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करायचा, तिथे एकतर संधींचा अभाव आहे. त्यातूनही मार्ग काढून व्यापक भूमिका घेवून कार्य करायचे ठरवले तरी अतिशय जुजबी, प्राथमिक व साध्यासुध्या गोष्टींपासून सुरुवात करावी लागते. काळाच्या गतीनुसार विचार केला तर आपण संथावतो ते यामुळे. त्यापेक्षा किमान आपला व्यवसाय करताना या प्राथमिक बाबींची काळजी घेवून (रोगोपचार सोडून) रोगप्रतिबंध होण्याच्या दृष्टीने जनावरांचा सांभाळ ग्रामीण तरुण बेरोजगार करतील, तर पशुवैद्यकाला त्यापुढची अत्याधुनिक तंत्रशैली पशुपालकापर्यंत पोचवताना व विकसित करताना आपले कौशल्य पणाला लावता येईल. स्पष्टपणे आणि उदाहरणांनीच सांगायचे तर - किमान गोठा स्वच्छ कसा ठेवावा (म्हणजे आपल्या जनावरांत रोगजंतूंचा प्रादुर्भाव होणार नाही), आहाराचे नियोजन कसे करावे (म्हणजे आपली जनावरे आहारातील कमतरतांना बळी पडणार नाहीत व त्यांची वाढ तसेच आरोग्य अबाधित राहील), ऋतूप्रमाणे त्यात बदल कोणते व कसे करावेत (म्हणजे आपल्या जनावरांच्या बदलत्या गरजांप्रमाणे पाणी, आहार, निवारा पुरवता येईल व त्यामुळे ऋतुजन्य आजार तर टाळता येतीलच पण त्यांच्या प्रजननादी शरीरक्रियांत बाधा येणार नाही), दूध कसे काढावे, राखावे, विकावे, त्याचे दुग्धजन्य पदार्थांत रूपांतर कसे करावे, हाती असलेल्या (तुटपुंज्याच का होईना) साधनसामुग्रीतूनच प्रगतीशील नियोजन कसे आखावे, या क्षेत्राच्या (व त्यायोगे एकंदर जीवनाच्या) अर्थकारणातील खाचाखोचांना, आणीबाणींना कसे सामोरे जावे, जनावरांच्या विविध शरीरक्रिया / वाढी / बदल / प्रजनन / उत्पादन तसेच जमाखर्चाच्या नोंदी कशा ठेवाव्यात, सहकार तत्वाने नफा-तोट्याचे वितरण / अभिसरण कसे करावे, सामूहिकतेचे फायदे, (संभाव्य धोके टाळून)अगदी जुजबी प्रथमोपचार आपल्या

व्यवसायापुरता कसा करावा ...अशा असंख्य बाबींचे विलक्षण शास्त्रीय असे प्रशिक्षण देणारा अभ्यासपूर्ण अभ्यासक्रम तयार करून निम्न शिक्षण विद्याशाखा विकसित होते आहे. त्यायोगे किमान दहावी पास असलेल्या, उत्साही, विकसिनशील विचारांच्या ग्रामीण युवकांना दिशा मिळावी आणि त्याचा परिपाक म्हणून पशुवैद्यक पदवीधरांना पूरक अशी तयार यंत्रणा मिळावी, जेणे करून स्वयंरोजगारातून अत्याधुनिक विकासाकडे जाणाऱ्या ,समाजाला व देशाला त्या मार्गावर नेणाऱ्या वाटा मिळतील. या अभ्यासक्रमातील यशस्वी ग्रामीण तरुण हे नव्या सुधारित व अभिनव अशा पशुपालनव्यवसायाचे पाईक तर ठरावेतच. पण त्यांनी स्वतःच्या उदाहरणांनी प्रेरित होणारा स्वयंपूर्ण समाज निर्माण करावा. त्याचप्रमाणे स्वतःही स्वयंपूर्ण व्हावे, स्वयंभू व स्वयंसिद्ध व्हावे हा यामागचा उद्देश आहे. स्वतः स्वतःच्या उमेदीचा, साधनांचा वापर करायला शिकावे. स्वतः उत्तम प्रशिक्षित (असल्यामुळे) पशुपालक उद्योजक व्हावे. आपली जनावरे स्वतः सांभाळताना शास्त्रीय आधार घ्यावेत. उपयोजावेत. एकीकडे माहिती व तंत्रज्ञानाचा महापूर वाहत असताना केवळ माहितीच्या अभावामुळे (व कमी शिक्षणामुळे) कुवत व ग्रामीण संसाधनांचे पाठबळ, जनावरांची साथ असताना आमचा ग्रामीण युवक दयनीय राहू नये. वंचित राहू नये. किमान स्वतःला सावरताना, उभारताना त्याला या माहिती व तंत्रज्ञानाच्या मार्गांची कमतरता भासू नये. याची तजवीज करणारा हा अभ्यासक्रम आहे.

मात्र, याबाबतीतही गफलत होताना (काही ठिकाणी जाणिवपूर्वक केली जात असल्याचे) दिसून येते. देशाच्या आर्थिक तसेच रोजगार क्षेत्रातील मर्यादा लक्षात घेता, प्रत्येकाला नोकरी मिळणे कठीण आहे. ही परिस्थिती सर्व जगभर थोड्याफार फरकाने आहे. त्यात आपल्या देशाचे किमान सुदैव असे की आपल्याकडे नैसर्गिक संसाधनांसोबत संस्कृतीचीही पूर्वपीठिका आहे. मात्र त्याची योग्य ओळख व वापर होणे गरजेचे आहे. निम्न शिक्षण अभ्यासक्रम म्हणजे ही ओळख करून देणारी प्रशिक्षणसंधी आहे. त्यामुळे मुळात स्वयंरोजगार करताना शास्त्रीय माहितीची अडचण भासू नये, एवढ्यासाठी या अभ्यासक्रमाची आखणी केलेली आहे. यास्तव, नोकरीचे आमिष मनात ठेवून हा अभ्यासक्रम करण्याऐवजी त्यातील माहिती स्वतःचा पशुपालन व्यवसाय करताना कशी उपयुक्त आहे, हे विद्यार्थ्यांना सांगितले गेले पाहिजे.

त्याचप्रमाणे, (पुनरुक्तीचा दोष स्वीकारून सांगणे महत्वाचे आहे की,) पशुवैद्यक व्यवसाय व पशुपालन व्यवसाय तसेच दुग्धोत्पादन या ज्ञानाच्या आवाक्याच्या दृष्टीने फार वेगळ्या ज्ञानशाखा आहेत. अकुशल व अर्धकुशल तसेच अर्धनिपुण पशुवैद्यक या क्षेत्राला धोकादायक ठरू शकतो, हे कळकळीने सांगतले गेले पाहिजे. त्यातील तथ्यांशांचा जाणिवेच्या पातळीवर (केवळ अस्मितेच्या नव्हे) विचार केला गेला पाहिजे. सर्वांनी तो केला पाहिजे. त्यामुळे या अभ्यासक्रमाच्या उद्देश्यांची मर्यादा लक्षात घेता आपल्याला या अभ्यासक्रमातून अकुशल / अर्धकुशल / अर्धनिपुण पशुवैद्यक तयार न करता कुशल / प्रशिक्षित पशुपालक व दुग्धोत्पादक व्यावसायिक तयार करावयाचा आहे, हे लक्षात घेतले जावे. कदाचित, कालांतराने व टप्प्याटप्प्याने असे प्रयत्न केल्यास पशुवैद्यक शाखेतच या पदविकाधारकांना पूरक / मदतनीस म्हणून (पशुधन पर्यवेक्षकाशिवाय) निम्न कुशल / अर्धकुशल अशी काही सेवापदे निर्माण करण्याविषयी शासनाकडे मागणी करता येवू शकेल. त्यामुळे शासकीय / निमशासकीय / खाजगी क्षेत्रातील पशुपैदास व अन्य प्रक्षेत्रासह काही विशिष्ट कार्यालयांतून त्यांच्या नेमणुका करता येता याव्यात याचीही शक्यता पडताळता येईल. तथापि, आज तरी संयमाने विहित उद्दिष्टांप्रत पोचणे हे साध्य आहे. मात्र या युवकांना पशुवैद्यक 'डॉक्टर' होण्याचे स्वप्न दाखवून ग्रामीण भागातील युवकांना बळेच या अभ्यासक्रमात कोंबले जावू नये. केवळ पशुवैद्यक सेवाच नव्हे तर सार्वजनिक आरोग्यासाठी, हितासाठी ते महत्वाचे आहे. वास्तविक पाहता याअगोदरही अशी प्रशिक्षणे विविध संस्थांनी दिलेली आहेत आणि त्याची परिणतीही समाजासमोर आली आहे. आजवर आपण ही जनावरे त्यांच्या ऊर्जेच्या, अंगभूत क्षमतांच्या अपव्ययापर्यंत सांभाळली आहेत. मात्र आता हे शोभणारे नाही. किंबहुना परवडणारे नाही. ग्रामीण भागातील युवकांच्या मनावर त्याचे महत्व बिंबवले गेले पाहिजे. (त्यासाठी 'उत्तम प्रशिक्षित पशुपालक व्हा''उद्योजक व्हा' अशीही जाहिरात व हीही घोषणा लोकप्रिय करता येते.) हे सर्वांनाच

करता येणे शक्य नाही याची जाणीव ठेवली तरी, किमान त्यांची दिशाभूल न होता, त्यांना स्पष्टपणे मात्र धीराने तसेच संवेदनशीलतेने व विशेष म्हणजे बांधिलकीने हे सांगितले, पटवून दिले पाहिजे. ही या विद्याशाखेशी संबंधित असणाऱ्या सर्वांचीच सामूहिक जबाबदारी आहे. ती सचोटीनेच आपण पाळत आहोत. यापुढेही ती पाळत राहू. याबाबतीत आपले काही आग्रह, संकल्पना यांत बदल करणे मात्र आवश्यक आहे. या शाखेची मूळ संकल्पना लक्षात घेवून त्या संकल्पनेपर्यंत पोचताना काही स्वार्थांचाही त्याग आपल्याला करावा लागेल. मात्र, त्याची फळे अवश्य मिळतील यावर विश्वास ठेवावा लागेल. निर्माण करावा लागेल. एकमेकांच्या मर्यादा, आकांक्षांचा संवाद घडवावा लागेल. नजिकच्या काळातील आयोजित कार्यशाळा ह्या, या संवादाचाच प्रत्यक्ष भाग आहेत.

प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी,
समन्वयक,
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय,
उदगीर जि. लातूर. ४१३ ५१७
दूरध्वनी :०२३८५-२५८७५६ (का)
भ्रमणध्वनी : ९४२२६ ५७८५०